जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 OCT 2017
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठाची शिवपावन मोहीम पदभ्रमंती

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आणि सह्याद्री प्रतिष्ठानने आयोजित पन्हाळा ते पावनखिंड ही शिवपावन पदभ्रमंती मोहीम विद्यार्थ्यांनी यशस्वी केली. यात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी कुटुंबियांसह सहभागी होत ५५ किलोमीटरचे अंतर पूर्ण केले.

सह्याद्री प्रतिष्ठानचे चिफ पेट्रन खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते मोहिमेचे उदघाटन झाले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेसह अन्य विद्यार्थी मोहिमेत उत्साहाने सहभागी झाले. शहाजी कॉलेजचा अर्जुन मिरजकर व विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागातील शुक्रिया मगदूम हे पांढरेपाणी परिसरात प्रथम पोहचल्याबद्दल त्यांचा सत्कार झाला. राजनंदिनी पाटील व कैवल्य शिंदे या पाच वर्षाच्या बालकांनी मोहीम पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार झाला.



मोहिमेत करपेवाडी येथे शाहीर रंगराव पाटील यांनी शाहिरी कला सादर केली. अभ्यासक राम यादव यांनी पावनखिंडीच्या इतिहासाची माहिती देऊन रोमांच उभे केले. अभिलेखापाल गणेश खोडके यांनी शिवरायांच्या पत्राची माहिती दिली. पन्हाळा नगराध्यक्ष रुपाली धडेल, शस्त्र संग्राहक गिरीश जाधव, रवी धडेल, हेमंत साळोखे उपस्थित होते. समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. डी. के. गायकवाड, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, नगरसेवक सुहास पाटील, नागरबाई शिंदे, अनिता शिंदे, डॉ. संगिता पाटील उपस्थित होते. प्राचार्य डी. डी. कुरळपकर यांनी आभार मानले. सुजित जाधव, प्रदीप थोरवत, चंद्रकांत वाघ, अक्षय पाटील, राजेंद्र काटकर आदींनी संयोजन केले.

5 OCT 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवपावन पदभ्रमंती मोहीम उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधीः**

शिवाजी विद्यापीठ आणि सह्याद्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने किल्ले पन्हाळा ते पावनखिंड परिसर अशा शिवपावन पदभ्रमंती मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. यात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले होते. त्याचबरोबर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे सहकुटुंब या मोहिमेत सहभागी झाले होते.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या संकल्पनेतून शिवाजी विद्यापीठ आणि सह्याद्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिवपावन पदभ्रमंती मोहीम' आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार १ व २ ऑक्टोबर २०१७ अशी दोन दिवसांची मोहीम आखण्यात आली. या पहिल्या मोहिमेत आपल्या परिवारासह पूर्ण वेळ सहभागी होऊन कुलगुरूंनी सर्व सहभागींना प्रोत्साहित केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि सह्याद्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने किल्ले पन्हाळा ते पावनखिंड या शिवपावन पदभ्रमंती मोहिमेमध्ये सहभागी झालेले एन.एस.एस.चे स्वयंसेवक.**

शिवपावन पदभ्रमंती मोहिमेचा समारोप पावनखिंडी येथे झाला. त्यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते पावनखिंड परिसरातील फरसबंदी मार्गाचे पूजन करण्यात आले. तत्पूर्वी, पांढरेपाणी ते पावनखिंडमार्गे पालखी मिरवणूक काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. शिवकालीन युद्धकलेच्या प्रात्यक्षिकांनी विद्यार्थी रोमांचित झाले.

शिवछत्रपतींचा आदर्श घेऊन तरुणांनी समाजाभिमुख विकास घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, सिद्दी जौहरच्या वेढ्यातून शिवछत्रपती सहीसलामत सुटावेत, यासाठी बाजीप्रभू देशपांडे, फुलाजीप्रभू देशपांडे, बांदल मावळ यांनी पराक्रमाची शर्थ केली. शेकडो मावळे धारातीर्थी पडले. स्वराज्यासाठी जीवावर उदार होऊन लढण्याची त्यांची तयारी होती. आजही पावनखिंडीचा इतिहास तरुणाईला जाज्वल्य देशप्रेमाची प्रेरणा देत आहे.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, मलकापूरचे नगरसेवक सुहास पाटील, नागरबाई शिंदे, अनिता शिंदे, डॉ. संगीता पाटील उपस्थित होते. प्रदीप थोरवत, सुजीत जाधव, राजेंद्र काटकर, अक्षय पाटील, प्रसाद पाटील, प्रवीण केंबळे, चंद्रकांत वाघ, शुभम कोळी, सागर पाटील, संग्राम मोरे यांनी संयोजन केले. प्राचार्य डी.डी. कुरळपकर यांनी आभार मानले.

रविवारी, सह्याद्री प्रतिष्ठानचे चीफ पेट्रन खासदार युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते मोहिमेचे उद्घाटन झाले. यावेळी नगराध्यक्ष रूपाली धडेल, ज्येष्ठ शस्त्रसंग्राहक गिरीश जाधव, रवी धडेल, प्रतिष्ठानचे अध्यक्ष हेमंत साळोखे उपस्थित होते. पदभ्रमंती मार्गावरील वाड्या-वस्त्यांवरील मुलांना कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते दप्तरांचे वाटप झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 OCT 2017

पुढारी

# पदवीसाठी लोकशाही निवडणूक सुशासन अभ्यासक्रम सक्तीचा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पदवी परीक्षेसाठी लोकशाही निवडणूक व सुशासन हा विषय सक्तीचा करण्यात आला आहे. शिवाजी विद्यापीठाने हा निर्णय घेतला असून पदवी परीक्षेस बसलेल्या विद्यार्थी या परीक्षेत नापास झाल्यास त्याचा पदवी प्रमाणपत्राचा निकाल राखून ठेवण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाने याबाबतचा निर्णय घेतला आहे. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सर्व विद्याशाखांतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना हा विषय सक्तीचा करण्यात आला आहे. पदवी अभ्यासक्रमाच्या भाग १ साठी हा विषय घेणे विद्यार्थ्यांना बंधनकारक आहे. सदरची परीक्षा ५० गुणांची आहे. यामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यांना २० गुण मिळणे आवश्यक आहे. हा विषय महाविद्यालयात शिकवला जाणार नाही. तर विद्यार्थ्यास स्वत: अभ्यास करून या विषयाची परीक्षा द्यावी लागणार आहे. या परीक्षा महाविद्यालय पातळीवर घेण्यात याव्यात, अशा सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. तसेच उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी संबंधित अधिविभागप्रमुख अथवा प्राचार्यांनी परीक्षा विभागाला सादर करायची आहे.

अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या विषयांबरोबरच महाविद्यालयाने या विषयाच्या परीक्षेचे नियोजन करायचे आहे. जर या परीक्षेत विद्यार्थी पास झाला नाही, तर त्याचा पदवी प्रमाणपत्राचा निकाल राखून ठेवण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना संविधानाची किमान माहिती असावी, या हेतून या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. यात भारताचे संविधान, संविधानाची गुणवैशिष्ट्ये, तत्त्व व योजना, संविधान सभा यांचा समावेश आहे



शिवाजी विद्यापीठातून

**विद्यार्थ्यांसाठी चांगला अभ्यासक्रम : डी.टी.शिर्के**

प्रायोगिक तत्त्वावर हा अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठाने सुरू केला आहे. यासाठी जो अभ्यासक्रम आहे त्याची सीडी तयार करण्यात आली आहे. ती महाविद्यालयांना देण्यात येणार आहे. व्हिडीओ लेक्चरच्या माध्यमातून या अभ्यासक्रमाची माहिती विद्यार्थ्यांना होणार आहे. महाविद्यालयांना आपल्या स्तरावर हा अभ्यासक्रम शिकवणे बंधनकारक आहे. राज्यशास्त्र विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबरच शास्त्र व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनाही संविधानाची माहिती मिळण्यास मदत होणार आहे, असे शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यांनी सांगितले.

5 OCT 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभ्यासू वक्ता ही काळाची गरज

## प्र-कुलगुरु डॉ.डी.टी.शिर्के यांचे प्रतिपादन : न्यू कॉलेजमध्ये वक्तृत्व स्पर्धा संपन्न

प्रतिनिधी
कोल्हापूर

आजच्या संगणकीय जगामध्ये प्रभावी व चिंतनशील वक्ते कमी होत चालले आहेत. म्हणून महाविद्यालयीन स्तरावर प्रभावी आणि अभ्यासू वक्ता तयार करणे ही काळाची गरज बनली आहे. यादृष्टीने ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन मोलाचे ठरते, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के यांनी केले.

येथील श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे न्यू कॉलेज, कोल्हापूर आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील व्याख्यानमाला व सांस्कृतिक कार्यक्रम समिती, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील म्हणाले, वाचाल तर वाचाल, खेळाल तर टिकाल आणि बोलाल तर समाजाला वाचवाल म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने भरपूर वाचन केले पाहिजे. चांगले शरीर मिळण्यासाठी खेळले पाहिजे.



कोल्हापूर : वक्तृत्व स्पर्धेच्या बक्षिस वितरणप्रसंगी मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डी. बी. पाटील, सी. आर. गोडसे, डॉ. एन. व्ही. नलवडे, प्रा. विनय पाटील, डॉ. ए. ए. कलगोंडा आदी.

परीक्षक डॉ. प्रा. शिवाजी भुकेले यांनी मनोगतामध्ये स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांच्या मांडणीचे कौतुक केले व काही सुधारणात्मक सूचना केल्या. परीक्षक म्हणून प्रा. डॉ. शिवाजी भुकेले, प्रा. डॉ. चंद्रकांत पोतदार, प्राचार्य डॉ. जी. पी. माळी, प्रा. सी. सी. चव्हाण, प्रा. डॉ. दिलीपकुमार वळवी, प्रा. डॉ. अरूण शिंदे, प्रा. डॉ. सुजित पाटील, प्रा. डॉ. हिमांशु स्मार्त यांनी काम पाहिले. या स्पर्धेमध्ये पुणे, नागपूर, औरंगाबाद व मुंबईसह राज्यभरातून ५५ स्पर्धक सहभागी झाले होते.

या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षिस पूर्वा कोडोलीकर (कालिदास महाविद्यालय रामटेक, नागपूर), द्वितीय क्रमांक तेजस्वीनी संजय पांचाळ (न्यू कॉलेज, कोल्हापूर), तृतिय क्रमांक अनिल गणेश कांबळे (किसनवीर महाविद्यालय, वाई) व उत्तेजनार्थ स्वरदा चंद्रशेखर फडणीस (केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर) यांना प्राप्त झाले.

स्पर्धेचे उद्घाटन प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे संचालक प्रा. विनय पाटील यांच्या हस्ते झाले. स्वागत प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे यांनी केले. पाहूण्यांचा परिचय उपप्राचार्य डॉ. ए. ए कलगोंडा यांनी करून दिला. स्पर्धा संयोजन समितीचे समन्वयक प्रा. जी. आर. पाटील यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. अनिता मगर व प्रा. संपदा मिराशी यांनी केले. कार्यक्रमासाठी आर. डी. पाटील वडगावकर, सी. आर. गोडसे, डॉ.पी. के. पाटील, एस. जे. नाईक, उपप्राचार्य प्रा. टी. के. सरगर, प्रा. अविनाश पाटील, प्रा. संग्राम पाटील, प्रा. प्रतिक चेंडके, प्रा. ए. जी. सूर्यवंशी, प्रा. बी. डी. गिरीगोसावी, प्रा. एस. जी. पाटील आदी उपस्थित होते.

5 OCT 2017
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवावी

## दिवाणी न्यायाधीश उमेशचंद्र मोरे यांचे आवाहन : रोटरी क्लबच्या शिक्षक पुरस्कारांचे वितरण

वार्ताहर
पुलाची शिरोली

सध्याची तरुण पिढी दुर्दैवाने बिघडत चालली आहे. अशावेळी पालकांच्या शिक्षकांकडून मोठ्या अपेक्षा आहेत. आई वडिलांच्या नंतर दुसरे विद्यापीठ म्हणून शिक्षकांना ओळखले जाते. शिक्षकांनी समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून कार्यरत राहिले पाहिजे, असे आवाहन कोल्हापूरचे दिवाणी न्यायाधीश उमेशचंद्र मोरे यांनी केले.

कोल्हापूर रोटरी क्लबच्या तीन शाखेच्या वतीने 'नेशन बिल्डर अवॉर्ड'च्या वितरण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे आयोजन रोटरी क्लब ऑफ शिरोली, रोटरी क्लब ऑफ गार्गीज, रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने केले होते. प्रास्ताविक रोटरी गार्गिजच्या अध्यक्षा विशाखा आपटे यांनी केले.



पुलाची शिरोली : रोटरी क्लब ग्रुपच्या वतीन दिलेले नेशन बिल्डर अॅवार्ड विजेते शिक्षक. सोबत कोल्हापूर दिवाणी न्यायाधिश उमेशचंद्र मोरे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, विशाखा आपटे, गौरी शिरगावकर आदी.

शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण करून करिअरसाठी बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. म्हणून या आव्हानांना तोंड देण्यास सक्षम बनवणारी शिक्षण प्रणाली विकसित करण्याची गरज निर्माण झाली आहे. रोटरीच्यावतीने स्वाभिमानी शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष सुधाकर निर्मळे (हेरले), जिल्हाध्यक्ष मिलिंद बारवडे (पेठवडगाव), सरचिटणीस भाऊसाहेब सकट (नानीबाई चिखली), राष्ट्रसेवा प्रशाला शिरोलीचे सुभाष पाटील, शिरोली हायस्कुलचे दशरथ चौगले, राजेंद्र स्कुल हालोंडीच्या अर्चना देशमुख यांच्यासह एकुण २३ शिक्षकांना 'नेशन बिल्डर अवॉर्ड' ने सन्मानित केले.

याप्रसंगी रोटरीचे डी.एल.सी.सी. प्रसन्ना देशिंगकर, ए. जी. दिलीप शेवाळे, रोटरी क्लब अध्यक्ष – विशाखा आपटे, रणजित सिंग, अभिजीत वैद्य, रोटरी क्लब गार्गिजच्या सचिव गौरी शिरगावकर, सुरेंद्र शिंदे, सचिन जाधव उपस्थित होते. सुत्रसंचालन शितल कुलकर्णी व सविता पदे यांनी केले.

### एड्सग्रस्त मुलांना मदत करण्याचे आवाहन !

जिल्ह्यातील एड्सग्रस्त मुले, तृतीयपंथी आणि वेश्या यांच्यासाठी मोठ्या मोठ्या प्रमाणात काम सुरु असून समाजातील या घटकांसाठी काम करण्यासाठी शिक्षकांसह रोटरी क्लबने पुढे येण्याचे आवाहन न्यायाधीश उमेशचंद्र मोरे यांनी यावेळी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 OCT 2017
लोकमत




कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठामध्ये जैवविविधता संवर्धन विषयावरील राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष डॉ. विलास बर्डेकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून एम. व्ही. शांताकुमार, पी. डी. राऊत, डी. टी. शिर्के उपस्थित होते.

# लोकजागृतीतून पर्यावरणाचा नाश टाळा

## विलास बर्डेकर : विद्यापीठातील जैवविविधता मंडळाची कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आपण सणांच्या नावाखाली पर्यावरणाचा, झाडापानांचा जो नाश करतो, तो टाळण्यासाठी लोकजागृती आवश्यक आहे. जडीबुटी विकणाऱ्या लोकांकडील ज्ञानही जतन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष डॉ. विलास बर्डेकर यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्र अधिविभाग, राज्य जैवविविधता मंडळ, वन विभाग, नागपूरतर्फे आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'जैवविविधता संवर्धन आणि जागृती' असा कार्यशाळेचा विषय होता.

जैवविविधतेच्या संवर्धनात स्थानिक लोकांच्या सहभागाबरोबरच त्यांच्याकडून जैवविविधतेची माहिती घेऊन तिचे संकलन करणे गरजेचे आहे.पीपल्स बायोडायव्हर्सिटी रजिस्टरमध्ये कर्नाटक, केरळमध्ये मोठ्या प्रमाणात नोंदी झालेल्या आहेत; परंतु, राज्यात हे प्रमाण दोन अंकी आहे, असे डॉ. शिर्के म्हणाले.

राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते. डॉ. बर्डेकर म्हणाले, आपल्याकडील ज्ञान, संशोधनाचे इतर देशांत खूप मोठ्या प्रमाणात संवर्धन होते. आपल्या देशात मात्र तसे होत नाही. त्या दृष्टीनेही आपण सदैव जागरूक राहणे आवश्यक आहे. जैवसंवर्धनासाठी शाश्वत प्रयत्न करीत राहिल्यास अंतिमत: ते मानवी समुदायासाठी लाभदायक आहे.

या कार्यक्रमास पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल पाटील, डी. व्ही. मुळे उपस्थित होते. प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ए. डी. जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. एम. व्ही. शांताकुमार यांनी आभार मानले. दरम्यान, सायंकाळी कोल्हापूरचे उपवनसंरक्षक डॉ. प्रभुनाथ शुक्ला, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप झाला. या कार्यक्रमात रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या यळगूड येथील शेतकरी आप्पासो झुंजार, विश्वास खोत यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

5 OCT 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जैवविविधतेचे संवर्धन लोकसमुदायाच्या हिताचे

## डॉ. बर्डेकर; 'जैवविविधता संवर्धन व जागृती' या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पर्यावरणात जैवविविधतेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अलीकडील काळात जैवविविधतेला हानी पोहोचत आहे. त्यामुळे जैवविविधतेच्या संवर्धनासाठी शाश्वत प्रयत्नांची गरज आहे. शाश्वत संवर्धन लोकसमुदायासाठी हिताचे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष डॉ. विलास बर्डेकर यांनी केले.

प्राणीशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, वन विभाग, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'जैवविविधता संवर्धन व जागृती' या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

यावेळी डॉ. बर्डेकर म्हणाले, सणांच्या नावाखाली झाडांचा, पानांचा आपण नाश करतो. तो टाळण्यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे. विविध वनस्पतीपासूनऔषधेतयारकरण्याची आपल्याकडे जुनी परंपरा आहे. अशी औषधे तयार करणाऱ्या लोकांकडील ज्ञान घेऊन त्याची जपणूक करणे आवश्यक आहे. आपल्याकडील ज्ञान व संशोधनाचे इतर देशांत मोठ्या प्रमाणात संवर्धन होत आहे. आपल्या देशात याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. शिवाजी विद्यापीठाचा परिसर हा जैवविविधतेचा वारसा जपणारा आहे. येथे अनेक प्रकारची फुलपाखरे सापडली.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'जैवविविधतेच्या संवर्धनात स्थानिक लोकांकडून माहिती घेऊन त्या माहितीचे संकलन केले पाहिजे. संवर्धन करण्याची जबाबदारी सर्वच घटकांची आहे. याबाबत विद्यार्थ्यांतही जागरूकता घडवून आणली पाहिजे. पीपल्स बायोडायव्हर्सिटी रजिस्टरमध्ये कर्नाटक, गुजरात, केरळ या राज्यांत मोठ्या प्रमाणात नोंदी झाल्या आहेत, महाराष्ट्रात अत्यल्प कमी प्रमाणात नोंदी झाल्या आहेत.

प्राणीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. डी. राऊत म्हणाले, 'जैवविविधतेच्या संवर्धनात आपला निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे, तिच्या संरक्षणासाठी सामुदायिकरीत्या शाश्वत स्वरूपाचे प्रयत्न करणे, स्थानिकांचे शिक्षण करणे, कायद्याची अंलबजावणी काटेकोरपणे करणे यासाठी प्रयत्न करणे आदी बाबींची सध्या आवश्यकता भासत असल्याचे सांगितले. यावेळी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. ए. डी. जाधव, डॉ. एम. व्ही. शांताकुमार, उपवनसंरक्षक डॉ. प्रभुनाथ शुक्ला, आप्पासो झुंजार, विश्वास खोत, विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती.

5 OCT 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत जैवसंवर्धन लोकसमुदायास लाभदायक

## - डॉ. विलास बर्डेकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** जैवसंवर्धनासाठी शाश्वत प्रयत्न करीत राहिल्यास अंतिमतः ते मानवी समुदायासाठी लाभदायक ठरणार आहे. आपण सणांच्या नावाखाली पर्यावरणाचा, झाडापानांचा जो नाश करतो, तो टाळण्यासाठी लोकजागृती करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष व भारतीय वनसेवेचे (निवृत्त) अधिकारी डॉ. विलास बर्डेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभाग आणि महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, वन विभाग नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'राज्यस्तरीय जैवविविधता संवर्धन आणि जागृती' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. विलास बर्डेकर. सोबत डॉ. एम. व्ही. शांताकुमार, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. डी. टी. शिर्के आणि डॉ. ए. डी. जाधव.**

डॉ. बर्डेकर म्हणाले, जडीबुटी विकणाऱ्या लोकांकडील ज्ञानही जतन करणे आवश्यक आहे. आपल्याकडील ज्ञान, संशोधनाचे इतर देशांत खूप मोठ्या प्रमाणात संवर्धन होते. आपल्या देशात मात्र तसे होत नाही. त्यादृष्टीनेही आपण सदैव जागरूक राहणे आवश्यक आहे. शिवाजी विद्यापीठाचा परिसर हा जैवविविधतेचा वारसा जोपासणारा आहे. या परिसरात विविध प्रकारची फुलपाखरे स्वच्छंदपणे विहार करताना आढळली. त्यामुळे हा परिसर खऱ्या अर्थाने बटरफ्लाय पार्क आहे.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, जैवविविधतेच्या संवर्धनात स्थानिक लोकांच्या सहभागाबरोबरच त्यांच्याकडून स्थानिक जैवविविधतेची माहिती घेऊन तिचे संकलन करणे गरजेचे आहे. जैवविविधता ही शिवाजी विद्यापीठ परिसराची श्रीमंती आहे. या जैवविविधतेचे संवर्धन करण्याची जबाबदारी सर्वच घटकांची आहे.पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ए. डी. जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. एम. व्ही. शांताकुमार यांनी आभार मानले. डॉ. डी. व्ही. मुळे यांच्यासह पर्यावरणशास्त्राचे दोनशेहून अधिक संशोधक विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

सायंकाळी बर्डेकर, कोल्हापूरचे उपवन संरक्षक डॉ. प्रभुनाथ शुक्ला (भा.व.से.) आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप समारंभ झाला. रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या यळगूड (ता. हातकणंगले) येथील शेतकरी आप्पासो झुंजार, विश्वास खोत यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या प्राणीशास्त्राच्या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 OCT 2017

लोकमत



कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठातील एम.बी.ए. अधिविभागातर्फे आयोजित अवयवदान जागृती शिबिरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. जयप्रकाश रामानंद यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ए. एम. गुरव, आदी उपस्थित होते.

# अवयवदानाबाबत तरुणांमध्ये जागृती गरजेची

## जयप्रकाश रामानंद : शिवाजी विद्यापीठातील शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : देशात सध्या मानवी अवयवांची मोठ्या प्रमाणात गरज आहे. या अनुषंगाने तरुणांमध्ये अवयवदानासंबंधी जागृती होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. जयप्रकाश रामानंद यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम. बी. ए. अधिविभागामध्ये आयोजित अवयवदान जागृती शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते. डॉ. रामानंद म्हणाले, अवयवदान जागृतीमध्ये तरुणांचे योगदान आवश्यक आहे. सध्या भारतामध्ये अवयवांची गरज असणाऱ्या लोकांची संख्या फार मोठी आहे. मात्र, दान करणारे लोक कमी आहेत. जर तरुणांचा सहभाग वाढला, तर ते या संदर्भात चांगले समाजप्रबोधन करु शकतील.

या कार्यक्रमात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. मोहन राऊत यांनी विद्यार्थ्यांना अवयवदानाची संपूर्ण प्रक्रिया यांची माहिती दिली. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. एम. बी. ए. अधिविभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी प्रास्ताविक केले. एम. बी. ए. विभागाच्या विद्यार्थ्यांनी यप्रसंगी अवयवदान जागृतीविषयक पथनाट्य सादरीकरण केले. शिबिराच्या दुपारच्या सत्रामध्ये भित्तिचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 OCT 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांना प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे हिवाळी सत्रात ५६८ परीक्षा घेण्यात येणार आहेत. त्याची सुरुवात बुधवारी बी.ए. आणि बी.एस्सी. अभ्यासक्रमाच्या चार आणि सहा सत्रातील पुनर्परीक्षार्थींच्या परीक्षांनी झाली. विविध अभ्यासक्रमांच्या ५६८ परीक्षा या हिवाळी सत्रामध्ये होणार आहेत. ८६ बी.एस्सी. अभ्यासक्रमाच्या, तर ३६ बी.ए. अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू झाल्या. यासाठी ३,४८७ पुनर्परीक्षार्थींनी नोंदणी केली आहे. दरम्यान, दिवाळीमुळे १५ ते २२ या आठ दिवसांत आणि १८ नोव्हेंबरला विद्यापीठाचा वर्धापनदिन असल्याने या दिवशी कोणतीही परीक्षा होणार नाही. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे म्हणाले, परीक्षाविषयक कामकाजात ज्युनिअर सुपरवायझरांना परीक्षार्थींच्या हजेरीबाबतचा अहवाल ऑनलाईन भरण्याची सूचना केली आहे. संबंधित अहवाल ऑनलाईन भरल्याने परीक्षेच्या पहिल्याच दिवशी २६७ परीक्षार्थींना ते परीक्षेला गैरहजर राहिल्याचा एसएमएस पाठविता आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 OCT 2017
लोकमत

# विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातर्फे हिवाळी सत्रात ५६८ परीक्षा घेण्यात येणार आहेत. त्याची सुरुवात बुधवारी बी. ए. आणि बी. एस्सी. अभ्यासक्रमाच्या दोन, चार आणि सहा सत्रातील पुनर्परीक्षार्थींच्या परीक्षांनी झाली.

बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी भाग एक, दोन, तीन, बीसीएस., बीबीए., बीसीए., बीए.बी.एड्., बीएस. डब्ल्यू., एम.ए., एमबीए., एम. कॉम., एमसीए., एल.एल.एम., बी. टेक., एम. ई., मास्टर ऑफ व्हॅल्युएशन, बॅचलर ऑफ डिझाईन, अशा विविध अभ्यासक्रमांच्या ५६८ परीक्षा या हिवाळी सत्रामध्ये होणार आहेत. या परीक्षांचा प्रारंभ बुधवारी झाला. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ८६ महाविद्यालयांमध्ये बी. एस्सी. अभ्यासक्रमाच्या आणि ३६ महाविद्यालयांत बी. ए. अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू झाल्या. दुपारी बारा ते दोन, दुपारी तीन ते सायंकाळी पाच आणि दुपारी चार ते सायंकाळी सहा यावेळेत पेपर झाले. यासाठी ३४८७ पुनर्परीक्षार्थींनी नोंदणी केली आहे. या परीक्षा सुरू झाल्याने महाविद्यालयांचा परिसर गर्दीने फुलला आहे. डिसेंबर अखेरपर्यंत या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत.



शिवाजी विद्यापीठातर्फे बुधवारी हिवाळी सत्रातील परीक्षांची सुरुवात झाली. शहाजी महाविद्यालयात पेपर सोडविण्यात परीक्षार्थी मग्न होते.

## सुमारे २५० परीक्षार्थींना संदेश

यावर्षीच्या हिवाळी सत्रापासून परीक्षा विभागाने एसआरपीडीची (सिक्युअर्ड रिमोट पेपर डिस्ट्रीब्युशन) व्याप्ती वाढविली आहे. त्यात बी. ए. आणि बी. एस्सीच्या सहाव्या सत्रासाठी एसआरपीडी कार्यान्वित केली असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले. ते म्हणाले, यावेळी परीक्षा विषयक कामकाजात आम्ही ज्युनिअर सुपरवायझरांना परीक्षार्थींच्या हजेरीबाबतचा अहवाल ऑनलाईन भरण्याची सूचना केली आहे. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. संबंधित अहवाल ऑनलाईन भरल्याने परीक्षेच्या पहिल्याच दिवशी आम्हाला २६७ परीक्षार्थींना ते परीक्षेला गैरहजर राहिल्याचा एसएमएस पाठविता आला.